शोध पत्र- भूगोल

Dec.-09—Jan.-2010

# देगलूर तालूक्यातील लोकसंख्या घणचेचा भौगोलिक अभ्यास

* डॉ. बी.जी. वेळापूरकर ** डॉ. बी.एन. नागलगावे
*** प्रा. एम.डी. निरुणे

*प्राचार्य, भूगोल विभाग, श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर
** भूगोल विभाग प्रमुख, पी.डी.यू. महाविद्यालय, देवणी, लातूर
*** भूगोल विभाग, महात्मा गाँधी महाविद्यालय अहमदपूर, लातूर

लोकसंख्या वितरणाचा अभ्यास करताना लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. लोकसंख्या भूगोल ही भूगोलाची अलीकडील महत्वाची शाखा आहे. ही शाखा स्वतंत्रपणे अभ्यास करण्यापूर्वी अनेक तज्ञाने लोकसंख्येच्या वितरणाची गुंतागुंत सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी अनेक संख्याशास्त्रीय पध्दतीचा वापर करण्याचे प्रयत्न करण्यात आले. लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासात लोकसंख्या वितरण व लोकसंख्येची घनता याचे पृथःकरण समजून घेणे खूपच महत्वाचे आहे. कारण लोकसंख्येच्या इतर गुणांचा संबंध या दोन घटकांशी असतो. एखाद्या प्रदेशात कार्यरत असलेल्या नैसर्गिक घटकाच्या एकत्रीत परीणामाची ही पध्दती असते.

**अभ्यास क्षेत्र –** प्रस्तुत अभ्यासासाठी नांदेड जिल्हयातील देगलूर तालूका निवडलेला आहे. महाराष्ट्र राज्यात देगलूर तालूका हा आंध्रप्रदेश, कर्नाटक व महाराष्ट्र राज्याच्या सिमेवर आहे. हा तालूका $18^0$ $15^1$ उत्तर अक्षवष्त्तापासून $18^0$ $42^1$ उत्तर अक्षवष्त्तापर्यंत तर $77^7$ $29^1$ पूर्व रेखावष्त्तापासून $77^0$ $46^1$ पूर्व रेखावष्त्ताचा दरम्यान पसरलेला आहे. ज्याचे क्षेत्रफळ 691.56 चौ.की.मी. आहे. देगलूर तालूक्याचा पूर्वेस आंध्रप्रदेश राज्य, पश्चिमेस मुखेड तालूका तर दक्षिणेस कर्नाटक राज्य व उत्तरेस बिलोली तालूका आहे.

**3 अभ्यासाची उद्दिष्टये–**सदरील शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहे. इ.स. 1991 ते 2001 या दहा वर्षाच्या काळातील देगलूर तालूक्यातील लोकसंख्येची मंडळ निहाय गणीती कषी व पोषण घनतेची भौगोलिक अभ्यास करणे.

**4 अभ्यास पध्दती –** प्रस्तुत शोध निबंध पूर्ण करण्यासाठी प्राथमिक व व्दितीय स्वरुपाच्या माहीतीस्त्रोताचा उपयोग केलेला आहे. लोकसंख्येची त्यात जनगणना अहवाल, सामाजीक व आर्थीक समालोचन यांचा आधार घेतलेला आहे. घणता अभ्यासण्यासाठी काही खालील बाबी सूत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

एकूण लोकसंख्या
गणिती घणता = <u>एकूण क्षेत्रफळ (दर चौ.की.मी.)</u>

एकूण लोकसंख्या
आहार घणता =<u>लागवडीखालील एकूण क्षेत्रफळ</u>

शेतीत गुंतलेले लोक
कषी घनता = शेतीखालील एकुण क्षेत्र

**5 गणिती घणता–** गणितीय घणता म्हणजे एखाद्या प्रदेशातील एकुण लोकसंख्या व त्याच प्रदेशाचे एकुण क्षेत्रफळ यांच्या मधील गुणात्तर होय. देगलूनर तालूक्यातील 1991 ते 2001 या दहा वर्षाच्या काळातील लोकसंख्येची गणीतीय घणता खालील तक्यात दर्शविली आहे.

वरील तक्यावरुन असे स्पष्ट होते की, देगलूर तालूक्यातील चारही मंडळामध्ये लोकसंख्येच्या गणितीय गणतेत वाढ झालेली आहे.

**6 पोशण घनता –** एकुण लोकसंख्या व एकुण लागवडी खालील क्षेत्र यांच्या गुणोत्तरास पोषण घनता असे म्हणतात. देगलूर तालूक्यातील 1991 ते 2001 या दहा वर्षाच्या काळात पोषण घणतेत मंडळ निहाय झालेला बदल खालील तक्यात दर्शविलेला आहे.

**तक्ता क्र. 1.1**

**मंडळनिहाय गणितीय घनताः 1991—2001**

| | वर्ष | 1991 | 2001 | |
|---|---|---|---|---|
| 1 | देगलूर | 170 | 196 | +26 |
| 2 | शहापूर | 209 | 232 | $29 |
| 3 | मरखेल | 234 | 260 | $26 |
| 4 | हणेगाव | 169 | 200 | $31 |
| 5 | देगलूर तालूका | 192 | 290 | $98 |

**स्त्रोत** — जनगणना अहवाल 1991 ते 2001.

**तक्ता क्र. 1.2**

**मंडळ निहाय पोशण घनता : सन 1991—2001**

| | वर्ष | 1991 | 2001 | |
|---|---|---|---|---|
| 1 | देगलूर | 175 | 201 | $26 |
| 2 | शहापूर | 229 | 255 | $26 |
| 3 | मरखेल | 252 | 289 | $37 |
| 4 | हणेगाव | 216 | 254 | $38 |
| | देगलूर तालूका | 218 | 329 | $111 |

**स्त्रोत**—जनगणना अहवाल 1991 ते 2001.

**तक्ता क्र. 1.3**

**मंडळ निहाय लोकसंख्येची काशी घनताः 1991 ते 2001**

| | वर्ष | 1991 | 2001 | |
|---|---|---|---|---|
| 1 | देगलूर | 65 | 68-96 | $3-96 |
| 2 | शहापूर | 100 | 92-31 | &7-69 |
| 3 | मरखेल | 94 | 100-68 | $6-68 |
| 4 | हणेगाव | 74 | 88-99 | $14-99 |
| | एकूण तालूका | 82 | 115-16 | $33-16 |

**स्त्रोत** : जनगणना अहवाल 1991 व 2001.

वरील तक्यावरुन असे स्पष्ट होते की, दहा वर्षाच्या काळात चारही मंडळाच्या पोषण घनतेत वाढ झालेली आहे.

**1.7 काशी घनता** — घनता काढण्यासाठी त्या प्रदेशातील शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या व त्याच प्रदेशातील एकुण शेती खालील क्षेत्र माहीत असणे आवश्यक असते. देगलूर तालूक्यातील मंडळ निहाय कृषी घनता खालील तक्यात दर्शविली आहे.

वरील तक्यावरुन असे स्पष्ट होते की, देगलूर मंडळात 3.96 टक्के कषी घनतेत एका दशकात वाढ झाली आहे. तर मरखेल मंडळात 6.68 टक्के, हाणेगाव मंडळात 14.99 टक्के, कषी घनतेत वाढ झालेली आहे. तर शहापूर मंडळात कषी घनतेत घट झालेली आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे येथे ग्रॅणाइटच्या फरशी व्यवसायाचा विकास, वणक्षेत्रावर आधारीत विडया, टोपली, चटाई इ. चा विकास होय. अशा कामात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण 1991—2001 या दशकात वाढलेले आहे. त्यामुळे कषी घनतेत घट झाली आहे.

**8 निष्कर्ष** — देगलूर तालुक्यातील लोकसंख्येची गणिती घनता, पोषण घनता, आणि कषी घनता याचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, गणितीय घनतेत 1991—2001 या काळात तालुक्यातील चारही मंडळात वाढ झालेली असून पूर्ण तालुक्यात 98 नी वाढ झालेली आहे. तर पोषण घनतेत तालुक्यात 111 नी वाढ झालेली असून कषी घनतेत शहापूर वगळता इतर मंडळता वाढ झालेली असून तालुक्याचा कषि घनतेत 33.16 ने वाढ झाली आहे. शहापूर मंडळात —7.69 ने धट झालेली आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे येथे ग्रॅनाइटचा फरशी व्यवसायाचा विकास वनक्षेत्रावर आधारीत विडी उद्योग व टोपली आणि चटई बनवण्याचा व्यवसाय होय.

## सन्दर्भ ग्रन्थ

1) नांदेड जिल्हा जणगणना अहवाल 1991—2001. 2) सामाजिक व आर्थिक समालोचन नांदेड जिल्हा 1991—2001. 3) मुंजेवार रफीक मंगलसाब (2009) देगलूर तालुक्यातील लोकसंख्येचा अभ्यास—एम.फील. लघुशोध प्रबंध 4) डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ. शहापूरकर लोकसंख्या भुगोल, अभिजीत पब्लीकेशन लातूर जून 2003.